सन २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी स्थापन केलेल्या केंद्रीय सबलीकरण समितीच्या अहवालातील शिफारशींच्या अंमलबजावणीसाठी पर्यवेक्षकीय समिती स्थापन करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१९/प्र.क्र.२६/१९/२-अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-३२.
दि. १६ सप्टेंबर, २०१९.

<u>वाचा :</u> अपर सचिव, कृषि, सहकार व शेतकरी कल्याण विभाग, कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे अर्धशासकीय पत्र क्र. १५-३/२०१६-FW(Pt-II) दि. २३.०८.२०१९

<u>प्रस्तावना :</u>

सन २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी केंद्रीय कृषि मंत्रालयाचे अंतर्गत स्थापन केलेल्या सबलीकरण समितीचा अहवाल केंद्रीय कृषि मंत्रालयाच्या वेबसाईटवर (www.agricoop.gov.in/doubling-farmers.) उपलब्ध आहे. या अहवालाच्या १४ व्या खंडात समितीचा संपूर्ण अभ्यास व शिफारशी यांचा सारांश समाविष्ट आहे. या शिफारशींची अंमलबजावणी राज्याच्या अखत्यारीत येत असल्याने पर्यवेक्षणासाठी समिती स्थापन करण्याचे शासनाच्या विचाराधिन होते. त्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

<u>शासननिर्णय :</u>

सन २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी स्थापन केलेल्या केंद्रीय सबलीकरण समितीच्या अहवालातील शिफारशींच्या अंमलबजावणीसाठी कार्यक्रमांतील हस्तक्षेप (interventions) व परिणाम (impact) यांचेसंदर्भात मार्गदर्शन व देखरेखीसाठी खालीलप्रमाणे पर्यवेक्षकीय समिती गठीत करण्यात येत आहे.

१. आयुक्त(कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे.	अध्यक्ष
२. कुलगुरु, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, अहमदनगर	सदस्य
३. कुलगुरु, डॉ. बाळासाहेब सावंत कृषि विद्यापीठ, दापोली, रत्नागिरी.	सदस्य
४. कुलगुरु, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.	सदस्य
५. कुलगुरु, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.	सदस्य
६. संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, पुणे.	सदस्य सचिव

२. उपरोक्त पर्यवेक्षकीय समितीने वेळोवळी कार्यक्रम अंमलबजावणीचा आढावा घेऊन केंद्र शासनास त्याबाबतचा अहवाल पाठवावा. तसेच सदर प्रकरणी राज्यस्तरावरील नोडल एजन्सी म्हणून कृषि आयुक्तालय स्तरावर एका कक्षाची स्थापना करण्यात येत आहे. सदर कक्ष आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य यांचे नियंत्रणाखाली असेल.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९१६१७५७२५४८०१ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

KIRAN N PATIL

Digitally signed by KIRAN N PATIL
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=657661007c4f6885bf8deae62f13606632589e592d8c18ceb9a49bfd30
471850, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=64a3950913946fa68fe576faead463fd8ae1e3844a820d921b6636
74927a476e, ou=AGRICULTURE DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA,
cn=KIRAN N PATIL
Date: 2019.09.16 18:08:52 +05'30'

(डॉ. किरण पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. कुलगुरु, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, अहमदनगर
५. कुलगुरु, डॉ. बाळासाहेब सावंत कृषि विद्यापीठ, दापोली, रत्नागिरी.
६. कुलगुरु, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.
७. कुलगुरु, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.
८. महासंचालक, महाराष्ट्र राज्य कृषि शिक्षण व संशोधन परिषद, भांबुर्डा, भोसले नगर, पुणे.
९. संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तायल, साखर संकुल, शिवाजी नगर, पुणे.
१०.संचालक (प्रक्रिया व नियोजन), कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजी नगर, पुणे.
११.निवड नस्ती.